द महाराष्ट्र
स्टेट केमिस्टस् अ‍ॅन्ड
ड्रगिस्टस् असोशिएशन
THE MAHARASHTRA
STATE CHEMISTS &
DRUGGISTS ASSOCIATION

SERVICE & SECURITY TO PATRONS
MSCDA

OFFICE : 301, Safalya Bldg., 3rd Floor,
Opp. Jaigopal Industrial Estate,
Baburao Parulekar Marg,
Dadar (W.R.), Mumbai - 400 028.
Phone : 2431 0043, 2431 0017
Fax : 022 - 2431 0114
e-mail : info@mscda.in
Affiliated to : AIOCD
All India Organisation of Chemists & Drugists.

संदर्भ : एमएससीडीए/१७१/२०२१ १६ नोव्हेंबर २०२१

**सर्व मुख्य कार्यकारिणी पदाधिकारी**
**सर्व झोन कार्यकारिणी पदाधिकारी / अध्यक्ष / सचिव जिल्हा संघटना**
**महाराष्ट्र राज्य केमिस्टस् अ‍ॅण्ड ड्रगिस्टस् असोसिएशन**

**विषय : संघटनेच्या सभासदांव्यतिरिक्त अन्य व्यापारी संस्थासोबत व्यवहार करणेबाबत**

महोदय,

राज्यसंघटनेकडे अनेक जिल्हा संघटना व सभासदांकडून सद्यस्थितीत ऑनलाईन औषध विक्री करणाऱ्या व्यापारी संस्था तसेच सभासदांव्यतिरिक्त घाऊक औषध व्यापार करणाऱ्या संस्था यांच्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांबाबत विचारणा करण्यात येत आहे. यापुर्वी ही अनेक वेळा संघटनेने या समस्येवर योग्य ते उपाय याबाबत मार्गदर्शन केलेले आहे.

राज्य संघटनेकडे येणाऱ्या तक्रारीमध्ये विशेष करुन ग्राहकास मोठया प्रमाणात दिले जाणारे डिस्काउंट तसेच अन्य व्यापारी संस्थाकडून रिटेलरला दिले जाणारे मोठया प्रमाणातील डिस्काऊंट याबाबत विचारणा करण्यात येते.

आम्ही आपणास यापुर्वी ही कळविल्याप्रमाणे आपले सभासद कायदेशीर बाबींचे उल्लंघन करणाऱ्या व्यावसायिक संस्थासोबत कोणताही व्यापारी करार अथवा संबंध प्रस्थापित करणार नाहीत याबाबत सर्व सभासदांना सुचित करण्यात यावे. आज निर्माण झालेल्या स्पर्धात्मक स्थिती मध्ये **होलसेलरने रिटेलरला व रिटेलरने ग्राहकास शक्य तेवढे डिस्काऊंट देऊन आपला ग्राहक सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न करावा.** तसेच ऑनलाईन औषध खरेदी मधील संभाव्य धोके याबाबतची माहिती ही ग्राहकास देण्याची पध्दती अवलंबवावी जेणेकरुन ग्राहकास त्याची योग्य माहिती होऊन ती आपणाकडूनच औषधी खरेदी करण्याचा प्रयत्न करेल.

आपल्या माहितीस्तव आज ही औषधी व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्या अंतर्गत नियम १९४५ नुसार ऑनलाईन औषधी विक्री करता येत नाही. याबाबत संघटनेने ड्रग कंट्रोलर जनरल ऑफ इंडिया (DCGI) तसेच आयुक्त अन्न व औषध प्रशासन यासह संबंधित मंत्री महोदय यांचेकडे अनेक वेळा तक्रारी केल्या आहेत. याबाबत विविध उच्च न्यायालय जसे मुंबई, दिल्ली, चेन्नई यांच्याकडून ही ऑनलाईन औषध विक्री कायदेशीर नसल्याबाबत आदेश पारित करण्यात आलेले आहेत.

याबाबत विविध मार्गदर्शन सभांद्वारे राज्य संघटना आपणास नियमितपणे माहिती देत आहे व यापुढे ही या स्पर्धेत टिकण्यासाठी राज्य संघटना आपल्या पध्दतीने कार्यरत राहिल. आपण आपणास वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे याची गांभीर्याने नोंद घ्यावी. जिल्हा संघटनांनी याबाबतची माहिती सर्व सभासदांपर्यंत पाठविण्याचे करावे.

कळावे.

आपला नम्र
**द महाराष्ट्र राज्य केमिस्ट अ‍ॅण्ड ड्रगिस्ट असोसिएशन**

अनिल नावंदर
सचिव